International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# वारली आदिवासी धर्म देव आणि संस्कृती

**डॉ. रामनाथ श्रीपती फुटाणे**
*मराठी विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा.*
*Corresponding Author – डॉ. रामनाथ श्रीपती फुटाणे*
**DOI - 10.5281/zenodo.17662084**

**प्रस्ताविक:**

वारली आदिवासींच्या आदिम संस्कृतीचा शोध घेत असताना आपणाला आदिवासींच्या धर्म देव आणि संस्कृतीचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे. आदिवासींच्या देव आणि धर्माचे स्वरूप हे हिंदू देव आणि धर्मापेक्षा पार वेगळे आहे. आदिवासींचा धर्म प्राथमिक अवस्थेतील असून तो असंकारित स्वरूपात आहे असे आपणाला वाटते. आदिवासी बांधव हा निसर्गाशी एकरूप निसर्गमय झालेला जीव! म्हणून वारली आदिवासींच्या जीवनात येणारे दुःख, दैन्य, दारिद्र्य, उपेक्षा, अज्ञान, अविश्रांत परिश्रम, शोषितता आणि संघर्ष वृत्तीने आपले जीवन अनेक अंगांनी आनंदमय करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या उत्पत्तीच्या कथा बरोबरच धर्म, देव आणि संस्कृती ,निसर्ग पूजा तसेच धार्मिक विधीच्या माध्यमातून आपापले वेगवेगळे धर्म मर्यादित अर्थाने त्यांना आपण टोळ्याचे धर्म अथवा जमात धर्म असे संबोधू/संबोधता येईल. सृष्टीमध्ये वेगवेगळ्या स्वरूपात प्रगट होणाऱ्या निसर्ग शक्तींची प्रतीके देवता स्वरूप मानणे व त्यांच्या विषयी भीतीयुक्त आदर बाळगणे हे वारली आदिवासी यांच्या देव धर्म आणि संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे असे आपणाला वाटते. याचा थोडक्यात परावर्ष प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**वारली आदिवासींचा धर्म:**

आदिवासींच्या धर्माचे स्वरूप हे हिंदू धर्मापेक्षा वेगळे आहे असे आपणाला प्रथम दर्शनी जाणवते. एकूणच आदिवासी जमातीचा धर्म प्राथमिक अवस्थेतील आहे म्हणूनच तो असं करीत आहे असे आपणाला वाटते. भारतात आज ४००हून अधिक आदिवासी जमाती आहेत. त्यांचे प्रत्येकाचे एका मर्यादित अर्थाने वेगवेगळे धर्म आहेत. त्यांना आपण उपरोक्त संबोधल्याप्रमाणे टोळ्यांचे धर्म किंवा जमात धर्म असे संबोधतो. आज आपण जो हिंदू धर्म म्हणून ओळखतो तोही एकेकाळच्या असंस्कृत व बाल्य अवस्थेतील जमात धर्माची आणि त्यानंतरच्या सुसंस्कृत अशा वैदिक धर्माचे हजारो वर्षाच्या संस्कारानंतरची एक प्रगत आणि प्रगल्भ अशी अवस्था आहे असे आपणाला अभ्यासांती म्हणता येईल. आदिवासींच्या धर्माची माहिती करून देत असताना डॉ.गोविंद गारे म्हणतात," इतर धर्म आणि आदिवासी धर्म यामध्ये एक मोठा फरक आहे. ख्रिस्ती ईश्वरांची मनुष्याच्या पित्याच्या ठिकाणी कल्पना केलेली आहे.

हिंदू धर्माने ईश्वराचे अंतिम स्वरूप सत्य, शिव व सुंदर असल्याचे मानलेले आहे. या धर्म संस्थापकाचे उपदेश, आचार, विचार नियमन तसेच हिंदू धर्म ग्रंथातील वेद, उपनिषदे, पुराणे ,संतांची शिकवण,ईश्वरांचे महात्म्य वगैरे धार्मिक संस्कार या धर्माच्या अनुयायावर झालेले असतात. या धर्मातून ईश्वराचे कनवाळूपणाचे किंवा वाचल्यामुळे त्याचे रूप वर्णलेले सापडते ते कोणत्याही आदिवासी धर्मात सापडत नाही. त्यांच्या सर्व देवता कोपिस्ट असतात त्यांच्या कोपामुळे मनुष्यावर सदा रोगराई, मृत्यू व इतर आपत्ती कोसळत असतात आणि म्हणून त्यांची विधीवत यथासांग व येताकाल पूजा करून त्यांना दारू, ताडी, कोंबडी, बकरी देऊन संतोष ठेवले पाहिजे अशी वारली आदिवासी यांची प्रामाणिक समजूत आहे".१

वारली रानचा राजा पण तो अठरा विश्व दारिद्र्यात आहे. अंगावर धड ना कपडा, राहायला ना धड झोपडी, पोटाला ना पोटभर अन्न, कसा बसा कष्टमय जीवन जगतो पण त्यातही आनंद मानण्याची जीवन निष्ठा व धर्मनिष्ठा यांच्या ठिकाणी आपणाला दिसून येते. निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वच्छंदी मोकळे जीवन जगत त्यांच्या वनसंस्कृतीकडून आनंदमय धर्म संस्कृती उपभोगण्याचा वारसा त्यांना मिळालेला आहे.नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून मनोभावेने श्रद्धेने व स्वच्छंदी मनाने धार्मिक विधी सण,उत्सव दिवाळी, शिमगा नारंनदेवाची पूजा तसेच इतर सर्व धार्मिक आणि सांस्कृतिक विधी मनोभावे करतात. याविषयी आपले विचार मांडत असताना गोविंद गारे म्हणतात," वारल्याचा दारू ताडीशिवाय कोणताही धार्मिक विधी पुर्ण होत नाही. तीच गत पाच-दहा हजार वर्षांपूर्वीच्या ऋग्वेदकालीन आर्यांचीही होती. त्यांच्या धार्मिक विधीमध्ये सोमरसाला महत्त्वाचे स्थान होते. वारली यांचा धर्म हा इतर आदिवासींच्या धर्मापेक्षा वेगळा नाही. निसर्गपूजा धार्मिक विधीत मध्यास दिलेले महत्त्वाचे स्थान व पिशाच योनीवरील श्रद्धा ही आदिवासींच्या धर्माची तीन मुख्य आणि प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. वरील सर्व वैशिष्ट्ये वारली जमातीच्या धर्मात आढळतात."२

**वारली आदिवासी जमातीची दैवते:**

वारली हा शेतकरी आहे.शेती पिकवणारा पाऊस हा वारली जमातीच्या मते सर्वश्रेष्ठ देव आहे. त्याला ते पावश्या परमेसर म्हणून संबोधतात. तो अमर आहे त्याला मरण नाही असे ते माणतात.त्याचप्रमाणे त्यांना धान्य देणारी धरतरी, शेतीच्या कामासाठी उपयोगी पडणारी गावतरी आणि जीवन जगवणारी कंनसरी या तीन पवित्र देवता वारली आदिवासी जमातीने मांनलेल्या आपणास अभ्यासांती पाहावयास मिळतात. कनसरी हातात घेऊन वारली कधीच खोटे बोलत नाही. इतर काही आदिवासी जमाती प्रमाणे गोवध किंवा गोमांस भक्षण ही प्रथा वारले आदिवासी जमातीमध्ये आढळून येत नाही. सूर्य आणि चंद्र हे आपणास प्रकाश देतात म्हणून तेही त्यांना पूजनीय आहेत. सूर्य. चांद. ढगेसर,विजेसर, पावसा देव असे उल्लेख वारली आदिवासींच्या गीतातून अनेक वेळा करताना आपणास ऐकावयास मिळतात. कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी देवता पूजन करण्याची वारली आदिवासी लोकांमध्ये प्रथा आहे.शेतात धान्य पेरण्यापूर्वी, कापण्यापूर्वी शेतातील देवतांची पूजा वारली आदिवासी करतात. खळ्यावरून धान्य घरात वाहून नेहन्यापूर्वी खळ्यावरील देवतांची पूजा करण्याची प्रथा आहे. झाडे तोडण्यास प्रारंभ करण्यापूर्वी जंगलातील देवतांची पूजा वारली लोक करताना आपणास पाहावयास मिळतात.पूजा करून देवतांना संतुष्ट केल्याशिवाय त्या देवतांची इडा पिडा टळत नाही

असे वारली आदिवासी लोकांची समजूत आहे. बेल,उंबर तुळस ही झाडे वारली लोक पवित्र मानतात. उपरोक्त झाडांचे लाकूड वारली सरपंण म्हणून जाळीत नाहीत. याविषयी आपले विचार मांडत असताना डॉ.गोविंद गारे म्हणतात,” वारली यांचा विशिष्ट देवतांचे वर्णन करण्यापूर्वी महालक्ष्मीच्या उल्लेख केला पाहिजे. आपल्या पुराणातून ज्या सप्तमातृकांचे वर्णन आलेले आहे त्या मूळच्या अनार्य देवता आहेत असे समजले जाते. काली,वज्रेश्वरी व महालक्ष्मी ह्या या सात पैकीच होत. वारल्यांच्या धर्मात महालक्ष्मीला स्थान नाही तथापि वारली प्रत्यक्ष जीवनात महालक्ष्मीला अत्यंत पूजनीय मानतात. तेथील देवालयांचे पुजारी पण सातवी आडनावाच्या वारली घराण्याकडेच आहे. वारली धर्म गीतातून महालक्ष्मीच्या नावाचा उल्लेख आढळतो. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला महालक्ष्मीचा मोठा होम व उत्सव होतो त्यावेळी मोठी यात्रा भरत असते. आजूबाजूच्या परिसरातून हजारो वारली त्या यात्रेसाठी त्या ठिकाणी चालत येतात. तिची पूजा करतात वारल्याच्या काही खास देवता आहेत. त्यापैकी वाघोबा किंवा वाघया, नारनदेव, हिरवा आणि हिमाई अशा चार प्रमुख देवता आहेत.”३ वाघया हा गाव देव असून नारनदेव हा इंद्र वरुणासारखा पावसाचा देव आहे. हिरवा हा कुटुंबाचा देव आहे आणि हिमाई त्याच्याबरोबर पूजली जाणारी एक देवता आहे.

**नारनदेव:**

नारायण देव हा सर्व वारली आदिवासी जमातीचा देव आहे. नारायण देव ही वारली जमातीची प्रजन्य देवता आहे. प्रजन्यावरच त्यांचे सारे जीवन अवलंबून असल्यामुळे या देवतेला ते सर्वात मोठी देवता मानतांना आपणास दिसून येतात. एखाद्या दगडाला किंवा सुपारीला शेंदूर लावतात आणि त्यालाच ते नारनदेव म्हणतात.आकाराने मोदकासारखा एका मोठ्या टोपलीत तांदूळ घालून त्यावर हा देव ठेवलेला असतो. प्रत्येक घराण्यात नारन देवाची फक्त एकच मूर्ती आपणास पहावयास मिळते. ती घराण्यातील इतरांना पूजेसाठी पाहिजे असेल तर ते मागून नेतात. हिंदू धर्मामध्ये कोणत्याही धार्मिक विधीच्या सुरुवातीला जसे गणपतीची पूजन करतात त्याचप्रमाणे वारली नारन देवाची पूजा करतात. माघ महिन्यातील शुद्ध द्वितीयेला वारली लोक नारंन देवाची पूजा मोठ्या समारंभाने करतात. याशिवाय भात पेरणीच्या वेळी, पावसाच्या सुरुवातीला डोंगरावर उगवणारी ‘कोली’ नावाची भाजी प्रथम खाण्या अगोदर आणि नवीन पिकलेला भात भाद्रपद महिन्यात प्रथम खाण्याअगोदर नारंन देवाच्या नावाने वारली घरात दिवा लावून ठेवताना आपणास पाहावयास मिळतात. माही बिजेच्या दिवशी नारन देवाची मूर्ती काढून घरात पाटावर तांदूळ पसरून त्यावर ती ठेवतात. जवळ पाण्याने भरलेले मडके किंवा कळशी ठेवतात त्यावर भगत नारळ ठेवतात. भगत हा वारली आदिवासी यांचा पुरोहित असतो.तो पूजा करतो. नारळ फोडतो. कोंबडीचा बळी देतो.नंतर तरुण पुरुष पानाफुलांनी शरीरशृंगारकरून त्याच्या भोवती नाचतात. पूजेचे सर्व विधी रात्रीच्या पहिल्या प्रहारात आटोपते घेताना वारली आपणास पाहावयास मिळतात.याविषयी आपले विचार मांडत असताना डॉ. गोविंद गारे आदिवासी लोकनृत्य लय, ताल आणि सूर ग्रंथात म्हणतात,” नारन देवाचा संबंध धान्य पिके यांच्या समृद्धीची आहे. त्यामुळे नवे भात निघाले की हा नाच होतो. त्याचप्रमाणे माघ महिन्याच्या शुद्ध बीजेला नारन देवाच्या पूजेच्या वेळी ‘कामड नाच’ करतात या नाचा साठी कोणतेही वाद्य वाजवले जात नाही.”४

**वाघयादेव:**

निसर्ग देवतांचे पूजा करणे हा वारली आदिवासी धर्माचा विशेष आहे. वाघया ही देवता हे एक चांगले उदाहरण आहे. ज्या भक्तीच्या प्रभावाने वाघ सिंह वगैरे हिंस्र पशु पासून त्यांचे व त्यांच्या गुरांचे संरक्षण होते असे वारले आदिवासी मानतात. त्या शक्तीला त्यांनी देवता मानले आहे. प्रत्येक गावाच्या बाहेरच्या बाजूला एखाद्या झाडीत सुमारे तीन फूट खांबासारखी उंच लाकडावर किंवा दगडावर कोरलेली वाघयाची ओबडधोबड अशी मूर्ती आपणास पाहावयास मिळते. वारली आदिवासी तिला शेंदूर लावतात. त्याच्या पाठीमागच्या बाजूला त्याच्यासारख्याच लाकडावर कोरलेल्या दुसऱ्या काही मूर्ती असतात ते वाघयाचे शिपाई असल्याचे वारली आदिवासी लोक सांगतात.अश्विन वद्यद्वादशीला म्हणजे दिवाळीच्या सुरुवातीला वारली आदिवासी वाघयाची पूजा करतात. आपल्याकडे अश्विन वद्य द्वादशीला गाय बैलांची पूजा करतात म्हणून त्या द्वादशीला ज्याप्रमाणे वसुबारस म्हणतात. त्याचप्रमाणे वारली आदिवासी लोक वाघया यांची पूजा करतात म्हणून ते या द्वादशीला वाघबारस असे म्हणतात. वाघया देव यांच्या पूजेविषयी आपले विचार मांडत असताना डॉ.गोविंद गारे म्हणतात," वाघ देव सर्व गावाचा पाडयाचा असल्यामुळे पूजेच्या विधीसाठी सर्व गावाकडून वर्गणी जमा केली जाते. त्याला वारली फाळा गोळा करणे म्हणतात. पूजेच्या दिवशी वाघयापुढे गोडया तेलाचा किंवा क्वचित तुपाचा दिवा लावतात. वागायला नवीन शेंदूर लावतात. त्याच्यापुढे नारळ फोडतात. त्याला कोंबडा बळी देतात. वाघया देव झाडीतच बसविलेला असतो.इतर देवघरात असतात पूर्वजांच्या नावाने एखाद्या देवाची स्थापना केली तर ती पाड्यावरच घरापासून दूर एखाद्या झाडाखाली केलेली असते त्यांना 'वीर' म्हणून ओळखले जाते."५

**हिरवा:**

'हिरवा' ही वारली आदिवासी जमातीची कुलदेवता आहे. उदाहरणार्थ बुगाडा या आडनावाची जेवढी कुटुंबे असतील त्याचा हिरवा देव एका प्रमुख कुटुंबियाकडे असतो. त्यांच्या पूजनाच्या वेळी ते सर्वजण एकत्र जमतात. हा देव समृद्धी देणारा आहे. हा देव अधिक रागीट आहे. त्याच्या सात नाऱ्या आहेत. या देवीची मूर्ती चांदीची बनवलेली असते. तिचा आकार माणसासारखा लहानसा असतो. लहानशी छोट्या आकाराची मूर्ती मोदकासारख्या टोपलीत तांदळामध्ये ठेवलेली असते. काही ठिकाणी लांबट कापडी पिशवी शिवून त्याच्यात या देवाची मूर्ती ठेवतात.एकात एक अशा दोन-तीन कापडी पिशव्या त्यातील सर्वात आतील पिशवीत देवाची मूर्ती असते. बाहेरच्या पिशवीच्या भोवती मोरांच्या पिसांची कुंची लावलेली आपणास पाहावयास मिळते.ही पिशवी भिंतीला टांगून ठेवता येते.सात नारींच्या वेगवेगळ्या मूर्ती नसतात.शेंदूर लावलेल्या चार आणि शेंदूर न लावलेल्या तीन अशा सात सुपाऱ्या एका टोपलीत ठेवतात. त्यांनाच हिरवा देवाच्या सात स्त्रिया म्हणतात. शेंदूर न लावलेल्या सुपाऱ्यांना कोरड्या नारी म्हणतात. कारण त्यांना कोंबडी वगैरे बळी द्यावे लागत नाहीत.हिरवा यांच्या शिपायांची मूर्ती कथलाची किंवा चांदीची असते. मूर्ती नसल्यास एखादी सुपारीच पूजेसाठी ठेवतातव तिला शिपाई समजतात. या शिपायाला देवाचा पारधी असे संबोधतात. कारण तो हिरवा देवासाठी मोरांची शिकार करून आणतो.अशी वारली आदिवासी लोकांची समजूत आहे.म्हणूनच हिरवा ला मोरांच्या पिसांच्या कुंचीत ठेवत असावेत असे आपणाला वाटते. तसेच ती पीसे हिरवट निळी

असल्यामुळे या देवाला हिरवा हे नाव पडले असावे असे आपणाला वाटते. वारली आदिवासींना मोरांचे मांस फार प्रीय पण ज्याच्या घरात मोरांच्या पिसाच्या पिशवीत हिरवा देव ठेवलेला असतो तो मोरांची शिकार करत नाहीत. त्याचे मांस खात नाही याविषयी आपले मत व्यक्त करताना डॉ. गारे म्हणतात," दरवर्षी नवीन पीक आल्यावर हिरव्या ची पूजा करतात. पिशवी फार जुनी झाली पिसे झडून जाऊ लागली की नवीन पिशवी तयार करतात.नवीन पिसांचा कुंचला तयार करून हिरवा देवाची स्थापना त्यासाठी मोठा धार्मिक विधी केला जातो या नवीन पिशवीत हिरवा देवाची पुनर्स्थापना करतात."६

**हिमाई:**

वारली आदिवासी जमातीत हिमाईची वेगळी पूजा न करता हिरवा देवतेच्या पूजेबरोबरच हिमाईची पूजा केलेली आपणास पाहावयास मिळते. हिमाईची मूर्ती चांदीचीच असते. देवाची पूजा करीत असताना भगताची देवाला बोलवण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. एका तांब्यात काटोकाठ पाणी भरतात त्यात भगत तांदळाचे थोडेसे दाणे टाकतो. दाणे ताब्यात खाली जाऊन परत वर कोरडेच आले पाहिजेत. त्याचप्रमाणे पाण्याचा बुडबुडा जसा फुटतो तसे वर आल्यावर वेगवेगळे झाले पाहिजेत. असे झाले तर देव पूजेसाठी येत आहे असे समजले जाते. असे करत असताना भगत काहीतरी तोंडातल्या तोंडात पुटपुटतो अंग हलवितो आणि देवाला उठ उठ म्हणून जोराने ओढून आदेश देताना आपणास पाहावयास मिळतो. नारनदेव व हिरवा हे एका घरात कधीही ठेवत नाहीत.त्यांना एका घरात राहणे आवडत नाही.असे वारली लोक सांगतात. त्याचप्रमाणे हिरवा हा देव पण सतत एकाच घरात राहत नाही. दर पाच वर्षानंतर मोठी पूजा करून त्याच कुटुंबातील दुसऱ्या घरात त्याला नेले जाते.

**चेडा, ब्रह्मा, हेडली, वीर आणि भुताळ्या :**

माणूस मरताना जर त्याची काही इच्छा अतृप्त राहिली तर तो बेडकाचा किंवा सापाचा जन्म घेऊन आपल्या घराच्या जवळच येऊन राहतो.असे वारली आदिवासी लोकांमध्ये समजूत आहे .या योनीला ते 'चेडा' म्हणतात.वारली चेडेला खूप घाबरतात .एखादा तरुण मुलगा मेल्यानंतर भूत होऊन पिंपळावर राहतो व सुंदर तरुण स्त्रियांच्या मागे लागून त्यांचा उपभोग घेतो असे वारली लोकांचा समज आहे. वारली लोक अशा भूताला 'ब्रह्मा' म्हणतात. गरोदर स्त्री मेल्यानंतर भूत होऊन एखाद्या झाडाखाली पाळणा हलवीत बसलेली दिसते. तिला वारली 'हेडली' असे म्हणतात. पाड्यावरील एखादा प्रतिष्ठित पूर्वज मेला तर तेथील लोक त्याच्या नावाने एखाद्या दगडाला शेंदूर लावून ठेवतात. त्याला वारली लोक 'वीर'असे म्हणतात. त्याला सण उत्सव प्रसंगी नारळ फोडतात. कुणी आजारी पडला व बरा होत नसला तर त्या पूर्वजाला वारली नवस करतात. आजारी माणूस बरा झाल्यावर नवस फेडतात.त्यामुळे तो पूर्वज वीर शांत राहतो व पिढा त्रास देत नाही असे वारले आदिवासी लोकांची समजूत आहे.काही स्त्रियांना थोडीशी मंत्रविद्या येते व त्या इतरांवर त्या विद्येचा प्रयोग करून दुःख देऊ शकतात. हे वारले आदिवासी लोकांना वाटते अशा स्त्रियांना ते 'भुताळ्या' म्हणतात. अशा भूताळयाची आपल्यावर अवकृपा होऊ नये यासाठी वारली आदिवासी विशेष काळजी घेताना आपणास पाहावयास मिळतात.

**भगत:**

वारली आदिवासी लोकांचा पुरोहित हा भगत असतो. भगताला या जमातीत फार मान दिला जातो. त्यांचा पुरोहित तोच, ज्योतिषीही तोच आणि वैद्यही तोच असतो. सर्व देवतांचे पूजन किंवा कोणताही

धार्मिक विधी भगत पार पाडतो. आजारी माणसाचे निदानही तोच करतो. घरात कोणी आजारी पडल्यानंतर वारली भगताला बोलवतात. आजारांचे निदान अनुमान भगत करतो. या क्रियेला वारली लोक खडी पाहणे किंवा दीवा हेरणे असे म्हणतात. विंचू किंवा साप चावल्यास भगत तो उतरवितो. औषधी देतो वारली लोक औषधाला वंनसी म्हणजे वनस्पती म्हणतात. ती औषधे देण्याची विद्या पवित्र रहावी म्हणून भगत लोक काही वृत्ते कडकपणे पाळत असताना आपणास पाहावयास मिळतात. भगताचे खास असे शिक्षण घ्यावे लागते. अनुभवी भगत होतकरु तरूण भगतांना शिक्षण वर्ग घेऊन शिकवतात. या शिबिराला रवाळ घालणे किंवा पलाड घालणे असे म्हणतात. हे रवाळ दसऱ्यापासून सुरू होऊन दिवाळीपर्यंत म्हणजे वाघबारसी पर्यंत चालतात. वारली तरुण येथे भगताच्या शिक्षणासाठी येतात. या विद्यार्थ्यांना मावले म्हणून संबोधतात. एखादा मोठा प्रतिष्ठित भगत हे शिबिर इतर एक दोन भगतांना मदतीला घेऊन चालवताना आपणास पाहावयास मिळतात. शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूला गुरुदक्षिणा म्हणून कोंबडा व दारू द्यावयाची प्रथा आहे. वारली जमात महाराष्ट्रात प्रामुख्याने ठाणे परिसरात वस्ती करून राहिलेली आपणास पाहावयास मिळते.

**वारली आदिवासी लोकांची संस्कृती:**

वारली आदिवासींची संस्कृती ही वन्य किंवा मागासलेली संस्कृती आहे असे आपणास पाहावयास मिळते. मातृप्रेम, पितृ प्रेम, बंधुभाव, वैवाहिक नीतिमत्ता, कृतज्ञतेची भावना, मुले व स्त्रिया यांचे संरक्षण, वृद्धांची अथवा अपंगांची निस्वार्थ सेवा इत्यादी सद्गुण व सद्भावना ही वारली आदिवासी लोकांच्या संस्कृतीची काही लक्षणे म्हणून आपणास सांगता येतील.परंतु माणुसकीची आणि संस्कृती दर्शक मूल्यांची कोणत्याही समाजात वाढ होण्यास भौतिक परिस्थितीची अनुकूलता असावी लागते वारली आदिवासी जमातीचे कौटुंबिक संबंध पुष्कळशे केवळ उपयुक्ततेच्या पायावर आधारलेले आपणास पहावयास मिळतात. त्यामुळे त्यांचे दारिद्र्य व अज्ञान यांच्या मर्यादा संस्कृती,विशेषता संस्कृती यांचे प्रतिबिंब धार्मिक व लोक जीवनात उमटलेले अभ्यासांती आपणास पाहावयास मिळते.

अशा प्रकारे उपरोक्त शोधनिबंधाच्या माध्यमातून वारली आदिवासी जमातीच्या धर्म, देव आणि संस्कृती विषयी थोडक्यात परामर्ष घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संदर्भ:**


१. डॉ. गारे गोविंद; ,वारली चित्र संस्कृती,; श्री विद्या प्रकाशन पुणे-३०,;तृतीय आवृत्ती -२ ऑक्टोबर २००७,; पृष्ठ क्रमांक-३९.
२. तत्रैव, पृष्ठ क्रमांक -३९.
३. तत्रैव, प्रश्न क्रमांक-४०.
४. डॉ. गारे गोविंद,; आदिवासी लोकनृत्य: लय ताल आणि सूर,;कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे-३०,; प्रथम आवृत्ती २००४, पृष्ठ क्रमांक २१.
५. डॉ. गारे गोविंद,; वारली चित्र संस्कृती,; श्री विद्या प्रकाशन पुणे-३०,; तृतीय आवृत्ती- २ ऑक्टोबर २००७,; पृष्ठ क्रमांक ४१.
६. तत्रैव,; पृष्ठ क्रमांक ४२.